# कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे
# के.जे. सोमैया कला,वाणिज्य विज्ञान महाविद्यालय
# मोहिनीराजनगर, कोपरगाव

## पुस्तक परिक्षण (Book Review)

**पुस्तकाचे नाव:-** जिजाऊ द मदर ऑफ ऑल गुरुज्

**लेखकाचे नाव:-** प्रा.नामदेवराव जाधव.

**प्रकाशन:**- राजमाता प्रकाशन

**प्रकाशन वर्ष:-** 30 सप्टेंबर 2017

**ISBN :-** 978-93-82510-20-8

**पृष्ठे :-** 224

**सुजाता देविदास साबळे.**

जिजाऊ द मदर ऑफ ऑल गुरुज याचे लेखक नामदेवराव जाधव आहेत. जिजाऊ द मदर ऑफ ऑल गुरुज या पुस्तकाचा विषयच मुळी एका आईने आपल्या  मुलाला असे काय शिकवले की जेणेकरून ते मुल एक जहागीरदाराचा मुलगा ते स्वतंत्र राज्याचा छत्रपती  इथपर्यंत प्रवास करू शकले. यामागे कोणती विचारधारा होती कोणते प्रशिक्षण, कोणते संस्कार, आणि कोणते हेतू असू शकतील याचा वेध घेणारे हे पुस्तक आहे. शिवाजी महाराजांना आपले करिअर प्लॅनिंग करताना समोर चार पर्याय होते 1) वडिलांच्या जहागिरीचा उपभोग घेत आरामदाय जीवन जगणे. 2)वडिलांच्या सोबत आदिलशाहीत मोठ्या पदावरची चाकरी करणे. 3) वडिलांच्या वशिल्याने दिल्ली दरबारात मोठी मनसबदारी मिळवणे. 4) स्वतःच्या हिंमतीवर जोखीम घेऊन स्वतःचे स्वराज्य तयार करणे. पहिले तीन मार्ग आणि पर्याय अत्यंत सोपे आणि तेवढेच आरामदायी होते पण ते समाजाला आणि शिवबांना भविष्य देऊ शकत नव्हते म्हणून मग जिजाऊ साहेब आणि शहाजीराजे यांनी आपल्या मुलासाठी करिअरचा चौथा मार्ग निवडला जो अत्यंत खडतर अवघड आणि तेवढाच जोखमांंनी भरलेला होता, पण यात जेवढी जोखीम होती तेवढीच मोठी दीर्घकालीन संधी देखील होती. याच मार्गातून शिवबांना मराठ्यांना आणि संपूर्ण महाराष्ट्राला दिशा मिळणार होती. शेकडो वर्षांची गुलामगिरी झुगारून मराठा स्वतंत्र होऊ शकणारा होता, मराठा मातीला मोकळा श्वास घेऊ देणारा आणि महाराष्ट्राला वैभव मिळवून देणारा स्वराज्य हा एकमेव मार्ग होता पण यासाठी आवश्यक होते ते जगावेगळे धाडस .इतर कोणतेही पालक आपल्या मुलांसाठी सुरक्षित प्रवासाचा आणि सुरक्षित भविष्याचा पर्याय निवडतात तेव्हाच या पालकांना आपल्या मुलाला एका धोकादायक प्रवासाच्या वाटेवरून एक

अनिश्चित भविष्याकडे जाण्याचा मार्ग स्वीकारावा लागणार होता आणि तेच केलं राजमाता जिजाऊ आणि शहाजीराजे यांनी. शिवाजी महाराजांचे करिअर आणि यश तीन गोष्टींच्या मजबूत पायावर उभे राहिले आणि ते तीन शब्द होते Ambition,Vision,Mission शिवाजी महाराजांकडे Ambition महत्वकांक्षा होती स्वतंत्र राज्य स्थापनेची. राजमाता जिजाऊंचे Mission ध्येय होते मुलाला स्वतंत्र राज्याचा सार्वभौम राजा करण्याचे. शहाजीराजांकडे Vision दूरदृष्टी होती आपल्या मुलाला राजा होण्यासाठी काय काय शिकवावे लागेल काय काय मदत करावी लागेल याची. वयाच्या केवळ बाराव्या वर्षी शिवाजी महाराज आपले स्वतंत्र राज्य निर्माण करण्यासाठी नवा इतिहास घडवण्यासाठी मातोश्री जिजाऊ यांच्यासोबत पुण्याला आले. या पुस्तकाला नाव दिले आहे जिजाऊ द मदर ऑफ ऑल गुरुज ते यासाठी की शिवाजी महाराजांनी नवीन राज्य स्वराज्य उभे करताना ज्या ज्या नवीन संकल्पना मांडल्या जे नवे नवे डावपेच टाकले ज्या अभिनव युक्त्या केल्या ज्या खमकेपणाने प्रशासन चालवले ज्या वेगाने स्वराज्य वाढवले आणि ज्या प्रमाणात रयतेचे प्रेम संपादन केले सैनिकांना जी करडी शिस्त लावली या सर्वांच्या मागे मास्टरमाईंड कोण होते तर त्या होत्या राजमाता जिजाऊ. लेखकाने त्यांना मदर ऑफ ऑल गुरुज संबोधण्याचे प्रमुख कारण हेच आहे की त्या शिवाजी महाराजांच्या केवळ माता नव्हत्या तर त्याचबरोबर गुरु देखील होत्या. स्वराज्य निर्मितीचा हा संकल्प सुरू झाला महाराजांच्या जन्मा अगोदर आणि हे स्वराज्य कार्य सुरू राहिले ते राजमाता जिजाऊ यांच्या निधनानंतरही. याचा अर्थ स्पष्ट आहे की शिवाजी महाराजांना गर्भात येण्यापूर्वीपासून ते पार राज्याभिषेक करून त्यांना छत्रपती करेपर्यंतच्या संपूर्ण प्रवासाची एक मार्गदर्शक म्हणून राजमाता जिजाऊ यांना सर्व श्रेय द्यावे लागते. तेव्हा मग आपणाला हा सहज प्रश्न पडतो की राजमाता जिजाऊ यांनी शिवाजी महाराजांना नक्की अशा कोणत्या गोष्टी शिकवल्या, कोणते प्रशिक्षण दिले, कोणते संस्कार दिले की ज्या बळावर महाराजांना अनेक अडचणी , अडथळे संकटे पार करून देखील स्वराज्य निर्माण करता आले.

आपल्या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजेच हे पुस्तक आहे. एका ध्येयवादी मातेने आपल्या महत्त्वकांक्षी मुलाला काय काय शिकवावे इथे पासून ते मुलाला काय खाऊ घालावे काय खाऊ देऊ नये ते त्याने कसे वागावे हे सर्व या पुस्तकात दिले आहे. संकटकाळी शिवाजी महाराजांच्या मागे खंबीरपणाने उभी राहणारी आई आणि आपल्या मुलाला दूरवरचे संधी टिपायला सांगणारी दूरदर्शी माता हा जिजाऊंचा प्रवास या पुस्तकाचा गाभा आहे. महाराजांना जे शिक्षण दिले प्रशिक्षण दिले तो या पुस्तकाचा आत्मा आहे. आणि ही प्रक्रिया नीट समजून घेतली तर मग असे हजारो शिवाजी जन्माला यावेत हाच या पुस्तकाचा प्रमुख हेतू आहे. पुस्तकात प्रामुख्याने करिअर प्लॅनिंग करताना ध्येय कसे ठरवावे ते कसे प्राप्त करावे त्यासाठी लागणारे शिक्षण काय घ्यावे माणसे कशी जोडावी ती माणसे कशी हाताळावी इथपासून ते स्वतःचे विक्रम स्वतःच मोडीत कसे काढावे आपले कीर्ती कशी जपावी राज्यविस्ताराची रणनीती कशी असावी वेगाने यश मिळवण्यासाठी काय करावे आपले आयुष्य कसे बदलावे अपयशातून यशाकडे कसे जावे कोणते लोक सोबत घ्यावे ते चांगल्या सवयी स्वतःला कशा लावाव्यात आणि प्रत्येक दिवशी आपण प्रगती करत आहोत की नाहीत याची खात्री कशी करावी आणि 1000 पटीत आपला विकास कसा करावा हे सर्व सांगितले आहे. आणि प्रचंड यशस्वी होत असताना आपण मागे वळून समाजाकडे का पहावे हेही सांगितले आहे. आज सर्व पालकांसमोर एकच प्रश्न मोठी एकच अडचण आहे आणि ती म्हणजे आम्ही आमच्या मुलांना काय शिकवावे तर याच प्रश्नाचे सविस्तर उत्तर या पुस्तकात आपणाला वाचायला मिळेल. लाखो लोकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आणि लाखो मुलांच्या भविष्याला कलाटणी देणारे हे पुस्तक नक्कीच शिवाजी द मॅनेजमेंट गुरु या पुस्तकाचे विक्रम मोडीत काढेल याची मला खात्री आहे. या पुस्तकाचा आधार घेऊन माता-पित्यांनी आपल्या मुलांना शिवबा राजांसारखेच प्रशिक्षण द्यावे आणि आपल्या मुलांनाही एकविसाव्या शतकातील शिवाजी म्हणून घडवावे. त्यांच्याकडून नवे राज्य नवा समाज नवे राष्ट्र निर्माण करून घ्यावे. घराघरात शिवाजी महाराज जन्माला यावेत घडावेत हाच

या पुस्तकाचा हेतू. आपण आपल्या मुलांना चांगले शिक्षण आणि प्रशिक्षण देऊन पार पाडावा हीच आपणाकडून अपेक्षा आहे. हे पुस्तक वाचून आपल्यातील मदर ऑफ ऑल गुरु जागी करा आणि आपल्या मुलाची आई ते एकमेव गुरु असा प्रवास देखील आवश्यक करावा. ज्ञान  पराक्रम, यश आणि संस्कार यासह राष्ट्रभक्त, समाज, उद्धारक अशी आपली मुले घडवू इच्छिणाऱ्या प्रत्येक महत्त्वकांक्षी पालकांसाठी हे ज्ञानामृत आहे. आपल्या मुलांना यातील सूत्रे, धडे, नियम, सवयी, शिस्त शिकवा आणि जगाला आदर्श वाटणारे शिवाजी महाराज घराघरात घडवा. राजमाता जिजाऊ यांनी शिवबाला ज्या मार्गाने घडविले तोच राजमार्ग आता तुमच्यासाठी देखील उघडा केलेला आहे. वाचा ,कृती करा आणि मग मुलांना शिकवा. त्यांच्याकडून या पुस्तकात सांगितलेल्या गोष्टी, नियम, सवयी कृतीत आणा. आपल्या हातांनी आपल्यासमोर आपल्या शिवबा घडवा. गर्भ संस्कार ते यशसंस्कार देणारे हे पुस्तक प्रत्येक पालकाची गरज पूर्ण करणारे अडचणी सोडवणारे आणि योग्य मार्गदर्शन करणारे असेच आहे. वाचा, मनन करा, अंमलात आणा आणि होणारी प्रगती अनुभवा.